नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०७/२०२५ (शनिवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २ आरोपी अटक, कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १८/०७/२०२५ रोजी कन्हान पोलीस रात्रगस्त करीत असतांना बोर्डा चौक, कन्हान येथे हायवा ट्रक क्र एम. एच. ४९ बी. झेड. १०११ हे वाहन जबलपूर ते नागपूर रोड ने नागपुर कडे जाताना मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे राकेश संतोष ठाकरे, वय २९ वर्ष, रा. गंगानगर, मानकापूर, नागपूर, आणि क्लिनर आरोपी नामे महेश राजाराम कोसरे ,वय ३४ वर्ष, रा. गंगाराम, मानकापूर, नागपूर यांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली नमुद वाहनात परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे आढळले. वाहन मालकाचे नाव आरोपी क्रं ३ नामे क्षितिज दिपक गोरले, रा. वसंतनगर, पार्वतीनगर, नागपूर **जि. नागपुर** असे असुन गाडी मालक आणि आरोपी क्रं ४ हरीष गोलवंशी, रा. काटोल नाका चौक, वाडी रोड, नागपूर याचे सांगण्यावरून अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** हायवा ट्रक क्र एम एच ४९ बीझेड १०११ किमती ६५,००,००० /रूपये **व २)** ७ ब्रास रेती किंमती ७०,०००/— रूपये आणि ३) १ अॅड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा एकुण ६५,८०,०००/— रूपयांचा माल जप्त करण्यात आला.

**नमुद आरोपी क्रमांक १ ते ४ यांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३ (२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम**

**१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्रं १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**

## मंदीरातील दानपेटीतील पैसे चोरी करणाऱ्यांचा तात्काळ घेतला शोध कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— पोलीस स्टेशन कन्हानयेथे फिर्यादी नामे रामकिृष्ण हरिमण बर्वे, रा. कांद्री कन्हान त.पारशिवनी यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक १७/०७/२०२५ रोजी रात्री १०:०० ते दिनांक १८/०७/२०२५ चे सकाळी ०७:०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने कांद्री कन्हान ता.पारशिवनी येथील दुर्गा माता मंदीराच्या आवारातील लोखंडी गेटचे कुलुप तोडुन मंदीराच्या आवारात ठेवलेली दान पेटी उचलुन नेवुन पेटीचे कुलुप तोडुन त्यातील नगदी रक्कम ६,३५०/— रुपये चोरुन नेले आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्रं ४९७/२०२५ कलम ३०५(ड), ३३१(४) भा.न्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

कन्हान पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करत गुप्त बातमीदारांकडुन माहीती काढुन अवघ्या २ तसात दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. दोन्ही विधीसंघर्ष बालकांकडुन २,१०० /— रूपये जप्त करण्यात आले आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १८/०७/२०२५ रोजी बोरी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की ड्रीम स्कुल, बोरी च्या बाजुने जुन्या वस्तीकडे जाणारे सार्वजनिक रोडवर काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१). जुनेद सुनूस शेख, वय २१ वर्ष, वार्ड क्र ०२, जुनी वस्ती, बुटीबोरी २). रंजित लक्ष्मी शाहु, वय २५ वर्ष, वार्ड क्र ०२, जुनी वस्ती बुटीबोरी ३). शुभम चंद्रशेखर अग्रवाल, वय ३२ वर्ष, वार्ड क्र ०२ जुनी वस्ती, बुटीबोरी ,४).विवेक राजेश सेमीलो, वय १९ वर्ष, रा. बूटीबोरी, ५). इरफान उर्फ भुऱ्या वजिर शेख, वय २८ वर्ष,**

**जुनी वस्ती, बुटीबोरी** हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व नगदी एकुन मिळालेला माल २५००/— रूपये आणि दोन मोबाईल असा एकुण **१२,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे**. नमुद ५ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३४ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर १९ आरोपी अशा एकुण १०२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २९ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


पोलीस स्टेशन
एम.आई.डी.सी. बुटीबोरी




पोलीस स्टेशन,रामटेक.







## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १८/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १९/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत भिवापुर टाऊन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तहसिल चौक भिवापुर येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.




गजानन
बी-बियाणे - किटकनाशके
Dulux


GOODS CARRIER
B.S.R
TATA
YARIYAAN



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने